# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४८८**

**अपिलार्थी ॲड. लक्ष्मण नारायण बेडेकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -०१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -०१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१०.२०२३ | - | ०६.०१.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०२.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर द्वितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

अपिलार्थी यांनी दि. ३०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांचेकडील आदेश दि. ०३.११.२००६ अन्वये कुमार बाळकृष्ण नारायण बेडेकर व कुमारी संगिता नारायण बेडेकर यांच्या शाळेच्या दाखलवहीत नोंदविलेली चुकीची जात व जन्मठिकाण दुरूस्त करून तसा दाखला मिळणेबाबत कार्यवाही केलीबाबतची, सदर प्रकरणातील मा. न्यायालयीन आदेश, शासन निर्णय दि. १६.०३.१९८३ व परिपत्रक, सक्षम अधिकारांचा अहवाल व आदेश त्याबाबतचे सर्व पत्रव्यवहार तसेच आपणांकडील नियम आणि शासनाचे नियम याची माहिती व त्या नियमानुसार कामकाज होत असल्यास, नसल्यास या कार्यवाहीचे नियम/पध्दती आणि आपलेकडील पत्रव्यवहार या सर्व बाबतची सविस्तर माहिती मिळणेकामी विनंती करीत आहे. उक्त प्रमाणे तसेच उपरोघातात उल्लेख असलेल्या या संचिकेच्या सर्व कागदपत्रांच्या छायांकीत व स्वाक्षांकीत प्रती मिळाव्यात. सदरची माहिती अति तात्काळ मिळावी जेणेकरून शैक्षणिक नुकसानी टळू शकेल, ही नम्र विनंती करीत आहे."*

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाहीत म्हणून अपिलार्थींनी दि. ०६.०१.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. ०९.०९.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांच्या अभिलेखाप्रमाणे अपिलार्थींचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यासनास प्राप्त झालेला नव्हता. परंतु, अपिलार्थी यांनी जेव्हा प्रथम अपील दाखल केले व त्यासोबत माहिती अर्ज संलग्न केला होता. तेव्हा माहिती अर्जातील विषय शालेय शिक्षण व क्रिडा विभागाशी संबंधीत असल्याने अपिलार्थींचा प्रथम अपील अर्जाची प्रत सहपत्रासहीत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडे हस्तांतरीत करुन दि. २२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना कळविलेले होते. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत अपील अर्ज हस्तांतरीत केला जात नाही असे कारण नमुद करुन दि. २७.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर अपील पुन्हा ग्राम विकास विभागाकडे पाठविले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे सादर केले की, उपरोक्त वस्तुस्थिती नमुद करुन अपिलार्थींचा अपील अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे दि. ०७.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थी यांना परत केली होती. कारण अपिलार्थींचा माहिती अर्ज प्राप्त झाला नाही व शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने प्रथम अपील स्विकारले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थींनी ग्राम विकास विभागाकडे केलेले प्रथम अपील अर्जासोबत संलग्न केलेला माहिती अर्ज उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अर्ज शालेय शिक्षण व क्रिडा विभागास माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदीप्रमाणे तात्काळ हस्तांतरीत करुन संबंधीत विभागास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळवावे व सदर पत्राची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०९.०९.२०२५**

State Information Commission Greater Mumbai